# कार्यालय नगरपरिषद, वर्धा

ई-मेल co.wardha@gmail.com

## आरोग्य विभाग (सन २०२६-२७)

## ई-निविदा सूचना

Parent portal : http://mahatenders.gov.in

जा.क्रं. आवि/३०२ /ई-नि. सू./नपव/२०२६ दिनांक ११/०५/२०२६

सर्व इच्छुक नोदणीकृत कंत्राटदार/ एजन्सी/संस्था यांना या व्दारे सूचित करण्यात येते की, वर्धा नगर परिषद हद्दीतील मान्सून पूर्ण नाले सफाई करणे करिता ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येते आहे. १% इसार रक्कम डी. डी. व्दारे दिलेल्या मुदतीत ऑनलाईन भरावयाची आहे. दिलेल्या मुदतीत न येणा-या निविदा स्विकृत करता येणार नाही. तसेच निविदा मंजुरीचे वा नामंजूरीचे संपुर्ण अधिकार मा. मुख्याधिकारी नगर परीषद वर्धा यांनी राखून ठेवलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजीत रक्कम | १% इसारा रक्कम रुपये | निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | वर्धा शहरातील प्रभाग क्र.१ ते २० नाल्यांची मान्सून पूर्व साफसफाई करणे व निघालेला गाळ, माती ट्रक्टर/ट्रकद्वारे वाहतूक करणे. | ~~२८,५३,८०४~~/- रुपये 27,40,392/- | २८,५४०/- 27404/- | ५६०/- (जि.एस.टी.सहित) |

ई-निविदा प्रसिद्धीचे वेळापत्रक

| अ.क्र | तपशील | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| | ऑनलाईन निविदा प्रसिध्दी करणे | दिनांकः-११ /०५/२०२५ ला सायं. ५.०० वाजता |
| | ऑनलाईन निविदा सादर करणे | दिनांकः-११ /०५/२०२५ ला सायं. ५.०० वाजेपासून ते दिनांकः-१८ /०५/२०२३५ला सायं. ५.०० वाजता पर्यंत |
| | निविदा करीता लागणारे कागदपत्र नेटवर अपलोड करण्याचा कालावधी | दिनांकः-११ /०५/२०२५ ला सायं ५.०० वाजेपासून ते दिनांकः-१८ /०५/२०२४ ला सायं. ५.००वाजेपर्यंत |
| | ऑनलाईन निविदा उघडणे | दिनांक :-२० /०५/२०२५ ला ~~दुपारी~~ सायं ५ .०० वा. (शक्य झाल्यास) |

Aadikar

विभाग प्रमुख
नगर परिषद वर्धा

मुख्याधिकारी
नगर परिषद वर्धा

नगर परिषद वर्धा

**अटी व शर्ती -**

१. कार्यादेश निर्गमित केल्यापासून नाले सफाईचे काम ३० दिवसात पूर्ण करावे लागेल.

२. कार्यादेश निर्गमित झाल्यापासून दुसऱ्या दिवशीपासून कामास सुरुवात करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. अन्यथा प्रती दिवस रुपये २५,०००/- दंड आकारण्यात येईल.

३. नाले/नाल्यांची साफ सफाई करीता लावण्यात येणा-या मजुराचे कंत्राटदाराने वेतन देणे बंधनकारक राहील.

४. कर्मचा-यांचे ईपीएफ व विमा काढण्याची कंत्राटदाराची जबाबदारी राहील.

५. नाले/नाल्या साफ सफाई केल्यानंतर निघालेला गाळ व माती वाहतुक न.प. ने सुचविलेल्या ठिकाणी वाहणाव्दारे वहन करणे बंधनकारक राहील. याकरिता लागणारे वाहने, मजूर व इतर साहित्य कंत्राटदाराने स्वतः लावणे बंधनकारक राहील.

७. नाले/नाल्या साफ सफाई केल्यानंतर निघालेल्या मालाची २४ तासाचे आत उचल करणे बंधनकारक राहील, अन्यथा प्रती दिवस १०००/- रुपये प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

८. सदर कामा करीता नगर परिषदेकडून कोणतेही साहीत्य/वाहन पुरविले जाणार नाही.

९. सदर काम करतेवेळी काही दुर्घटना/अपघात होवून प्राणहानी/वित्तहानी झाल्यास त्यास नगर परिषद जबाबदार राहणार नाही. सर्वस्वी जबाबदारी ही कंत्राटदाराची राहील.

१०. शहरातील प्रभागामधील नाले सफाई करताना प्रभागाचे संबंधित नगरसेवक व नागरिक आणि स्वच्छता विभाग यांचेशी योग्य समन्वय साधून काम करणे व कामाचे दैनंदिन नोंदी घेऊन प्रभागाचे नागरिक/ नगरसेवक यांच्या दैनंदिन कामाच्या नोंदी वर स्वाक्षरी घेणे कंत्राटदाराला बंधनकारक राहील.

१०. कामाची सविस्तर माहीती, अटी व शर्ती आरोग्य विभाग नगरपरिषद वर्धा यांचे कडे कार्यालयीन वेळात माहित प्राप्त होवू शकेल.

११. निविदा फॉर्म www.mahatenders.gov.in या online वेबसाईटवर उपलब्ध आहे.

१२. या व्यतिरिक्त इतर अटी व शर्ती मा. मुख्याधिकारी व मा. अध्यक्ष ठरवतील त्या वेळोवेळी कंत्राटदाराला लागू राहतील.

१३. कोणतीही एक किवा सर्वच निविदा कारण न देता रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद वर्धा यांनी राखून ठेवले आहे.

१४. ई-निविदेबाबत सर्व अटी व शर्ती मान्य असलेले परीशिष्ट्य -२ मधील प्रमाणपत्र, कोणत्याही स्तरावर काळ्या यादीत नाव नसलेले परीशिष्ट्य-३ मधील प्रमाणपत्र व न.प.वर्धा नगरसेवकाशी कसल्याही पद्धतीने कामाशी सबंध नसलेले प्रतिज्ञापत्र परीशिष्ट्य -४ मधील प्रमाणपत्र रु.१००/-च्या स्टँप पेपरवर स्वाक्षरीसह स्कॅन करून जोडावेत.

१६. निविदेमध्ये नमूद केल्याप्रमाणे विहित कालावधीत संबंधित काम पूर्ण करणे कंत्राटदारास आवश्यक राहील अन्यथा प्रती दिवस १०,०००/- रुपये विलंब शुल्क आकारण्यात येईल.

१७. निविदेच्या अनुषंगाने झालेला पत्रव्यवहार व शासन स्तरावरून वेळोवेळी प्राप्त झालेले निर्देश निविदा धारकास बंधनकारक राहतील.

१८ . निधीच्या उपलब्धते नुसार संबंधित कामाचे देयक अदा करण्यात येतील. निधी उपलब्ध होण्यास विलंब झाला किंवा या आर्थिक वर्षात निधी उपलब्ध न झाल्यास निविदा धारकास देयके दिली जाणार नाहीत तसेच कोणत्याही प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही तसेच कोणतेही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही याची स्पष्ठ नोंद घ्यावी.

१९ . महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक :सीएटी/२०१८/प्र.क्र.१२७/इमा-

नगर परिषद वर्धा
वर्धा

२ नुसार निविदेसोबत जोडलेली (अपलोड केलेली ) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र परीशिष्ट्य-१, रु.१००/- च्या स्टँप पेपरवर स्वाक्षरीसह स्कॅन करून लिफाफा क्र.१ मध्ये जोडणे बंधनकारक आहे.

२०. घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ मधील सर्व नियमाचे पालन करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

२१. कर्मचाऱ्यांना सुरक्षा विषयक उपाययोजना करणे कंत्राटदाराला बंधनकारक राहील.

२२. गाळ वाहतुकीकरिता कंत्राटदाराने बंधिस्त वाहनाचा वापर करणे बंधनकारक राहील.

२३. वेळोवेळी प्राप्त नाले सफाई करिता प्राप्त तक्रारींचे तात्काळ निराकरण करणे कंत्राटदाराला बंधनकारक राहील.

२४. नाले सफाई करिता लागणारे साहित्य कंत्राटदाराने पुरविणे बंधनकारक राहील.

➢ **Technical Document**

१. नोंदणी प्रमाणपत्र
२. EPF Registrations Certificate
३. Last Three Year ITR (AY-2021-22, AY-2022-23, AY-2023-24)
४. GST Registration
५. Pan Card
६. नाले सफाई बाबत अनुभव प्रमाणपत्र

**विभाग प्रमुख**
**नगर परिषद वर्धा**

नगर परिषद वर्धा
वर्धा

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वर्धा**

Signature Not Verified
Digitally signed by VIJAY DHANRAJ DESHMUKH
Date: 2026.05.11 15:54:53 IST
Location: Maharashtra-MH